# खात्याविषयी

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची स्थापना सन १९८६ या वर्षी झाली.यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून ६०:४० प्रमाणे निधी उपलब्ध मिळत होता.याअंतर्गत एसजीएसवाय, एसजीआरवाय,आयआरडीपी,आयएवाय इ.योजना राबविल्या जात असत.

सध्यस्थितीत आयएवाय योजनेचे रुपांतर सन २०१६ पासून प्रधानमंत्री आवास योजना(पीएमएवाय) मध्ये करण्यात आले व २०१४ पासून २०१९ पर्यंत ५ वर्षात देशातील सर्व जिल्ह्यात एनआरएलएम अंतर्गत बचत गट बांधणीचे काम मिशन मोडवर चालू करणेत आले आहे.या २ केंद्र शासनाच्या योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत सुरु आहेत.

**खात्यामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व विषयांची यादी**

१.केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजना-ग्रामीण

२.राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान-उमेद

३.दिशा समिती

# विविध योजनांची माहिती

१.प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

२.रमाई आवास योजना

३.शबरी आवास योजना

४.पारधी आवास योजना

५.अटल बांधकाम कामगार योजना

६.यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

७.पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजना

८.अतिक्रमण नियमानुकुल करणे

९.राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण ) या योजनेत लाभार्थी यादी कशी तयार केली जाते | सन २०१६-१७ पासून सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ च्या माहितीवरून या योजनेसाठी आवास सॉफट प्रणालीमध्ये Generated Priority List नुसार बेघर / २ खोल्या पर्यंत कच्चे घरात वास्तव्य करणारे लाभार्थी यांची दि. १५ ऑगस्ट २०१६ व त्या दरम्यान होणा-या ग्रामसभेमध्ये मान्यता घेवून प्राधान्य क्रम यादी तयार करणेत येईल. त्या प्राधान्य क्रम यादीची तालुकास्तरीय समिती व जिल्हास्तरीय समिती कडून मान्यता घेवून अंतिम यादी तयार करणेत येईल. |
| २ | प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण ) या योजनेत घरकुल बांधकामासाठी किती अनुदान प्राप्त होते | प्रति घरकूल १,२०,०००/- (एक लाख वीस हजार मात्र ) घरकूल बांधकामास प्रगतीनुसार चार हप्तामध्ये अनुदान प्राप्त होते. |
| ३ | प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण ) या लाभार्थ्यांना इतर कुठला लाभ मिळू शकतो | जर लाभार्थ्यांना घर बांधणेसाठी जागा उपलब्ध नसेल अशा लाभार्थी यांना पंडित दीनदयाळ घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून रक्कम रु ५०,०००/- पर्यय अनुदान उपलब्ध होऊ शकले. त्याचप्रमाणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ९० मनुष्य दिनाचे अकुशल कामाची मंजुरी अनुदान प्राप्त होईल त्याचप्रमाणे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत निकषाप्रमाणे शौचालय बांधकामाबाबत अनुदान प्राप्त होईल |
| ४ | रमाई आवास योजनेंतर्गत घरकुलाची रक्कम किती टप्पामध्ये देणेत येते? | रमाई आवास योजनेंतर्गत घरकुलाची रक्कम चार टप्पामध्ये देणेत येते.पहीला हप्ता घरकुल मंजूर झाल्यानंतर, दुसरा पाया पूर्ण, तिसरा हप्ता लेन्टल लेव्हल चौथा व अंतिम हप्ता घरकुल पूर्वहोऊन शौचालय व बाथरूम बांधकाम पूर्ण झाल्यानंतर देणेत येतो. |
| ५ | रमाई आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थी निवडण्याचे निकष कोणते आहेत ? | अ ) लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द संकवर्गातील असावा, ब ) लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे क ) लाभार्थ्यांकडे स्वत:चे किंवा कुटुबियांचे पक्के घर नसावे. ड ) लाभार्थीने शासनाच्या अन्य गृहनिर्माण योजनेचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा. |
| ६ | रमाई आवास योजनेचा लाभ कोणत्या शासन निर्णयाने दिला जातो. | १) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. बीसीएच-२००९ / प्रक्र.१५९/मावक-२ दिनांक ०९ मार्च २०१० २) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन ज्ञापन क्र. बीसीएच- २०१४ / प्रक्र.१०/बांधकामे-२ दिनांक १८ जुलै २०१४ |
| ७ | रमाई आवास योजनेंतर्गत कोणत्या प्रवर्गाला लाभ दिला जातो. | रमाई आवास योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. |
| ८ | रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांला शासनाकडून किती अनुदान प्राप्त होते ? | रमाई आवास योजनेंतर्गत रु १.२० लाख अनुदान शासनाकडून लाभार्थ्यांना प्राप्त होते . |
| ९ | रमाई आवास योजनेंतर्गत लाभ घेणेसाठी कोणते कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे ? | रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांने खालीप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे<br>अ ) ७/१२/ चा उतारा , मालमत्ता नोंदपत्र , ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक<br>ब ) घरपट्टी , पाणीपट्टी,विद्युत बिल या कागदपत्रापैकी एक<br>क ) सक्षम प्राधिका-याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. |
| १० | रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थी निवड कोणत्या पद्धतीने करणे येते ? | दारीद्रय रेषेखालील यादीत असणा-या अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांना घरबांधण्यास गावामध्ये जागा आहे. अशा लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये तयार करून तालूकानिहाय प्रतिक्षा यादी तयार करणेत येते. तालूकानिहाय ग्रामपंचायतीची प्रतिक्षा यादी तयार करता किमान लाभधारक ते कमाल लाभधारक अशी चढत्या क्रमाने |

| | | |
|---|---|---|
| | | तयार करणेत येते. सामाजिक न्याय विभागाकडून उपलब्ध होणारा निधी व लाभधारकांची संख्या यांच्या प्रमाणात घरकुल मंजुर करणेत येते . |
| ११ | रमाई आवास योजनेंतर्गत अपंग लाभार्थ्याकरीता कोणती तरतुदकरणेत आली आहे ? | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन निर्णय क्र.आयो-२०१५/प्र.क्र.४२०/बांधकामे दि.३१ डिसेंबर २०१५ नुसार रमाई आवास योजने अंतर्गत अपंग लाभार्थ्यांना दारीद्रय रेषेखालील असण्याची अट शिथिल करणेत आली आहे. सदर योजनेंतर्गत ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असणे व वार्षिक उत्पन्न एक लाखापर्यंत असणे आवश्यक आहे . |
| १२ | रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्याला लाभार्थी हिस्सा किती भरावा लागतो? | रमाई आवास लाभार्थ्यांना लाभार्थी हिस्सा निरंक आहे. |
| १३ | रमाई आवास योजनेंतर्गत घराच्या बांधकामाचे क्षेत्र किती असावे? | रमाई आवास योजनेंतर्गत घराच्या बांधकामाचे क्षेत्र २६९ चौ फुट असावे |
| १४ | शबरी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्याला शासनाकडून किती अनुदान प्राप्त होते ? | शबरी घरकुल योजनेंतर्गत रु १.२० लाख अनुदान शासनाकडून लाभार्थ्यांना प्राप्त होते . |
| १५ | शबरी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्याला लाभार्थी हिस्सा किती भरावा लागतो? | शबरी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना लाभार्थी हिस्सा निरंक आहे. |
| १६ | शबरी घरकुल योजनेचा लाभ कोणत्या शासन निर्णयाने दिला जातो. | १) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक घरकुल २०१२/ प्र. क्र ३८(भाग-१) का १७ दिनांक २८ मार्च २०१३ २) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक घरकुल २०१२/ प्र. क्र ३८ (भाग-१) का १७ दिनांक ७ ऑगस्ट २०१४. |
| १७ | शबरी घरकुल योजनेंतर्गत लाभ घेणेसाठी कोणते कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे ? | शबरी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्याने खालीप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे<br>अ ) ७/१२/ चा उतारा , मालमत्ता नोंदपत्र , ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक<br>ब ) घरपट्टी , पाणीपट्टी,विद्युत बिल या कागदपत्रापैकी एक<br>क ) सक्षम प्राधिका-याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. |
| १८ | शबरी घरकुल योजनेंतर्गत पात्र लाभार्थी निवडण्याचे निकष ? | अ ) लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती संकवर्गातील असावा, ब ) लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे क ) लाभार्थ्याकडे स्वत:चे किंवा कुटुबियांचे पक्के घर नसावे. ड ) अर्जदाराच्या कुटुंबाचे वाषिक उत्पन्न मर्यादा रु १ लाख राहील इ ) लाभार्थ्याकडे स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जमीन असणे आवश्यक आहे |
| १९ | शबरी घरकुल योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर लाभार्थी निवड करणेचा अधिकार कुणाला आहे? | या योजनेंतर्गत लाभार्थी निवड शासन निकषाप्रमाणे करणेचा अधिकार ग्रामसभेला असून प्राधान्यक्रमही ग्रामसभेने ठरविणेचा आहे. |
| २० | शबरी घरकुल योजनेंतर्गत कोणत्या प्रवर्गाला लाभ दिला जातो. | शबरी घरकुल योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. |
| २१ | शबरी घरकुल योजनेसाठी वाषिक उत्पन्न मर्यादा किती आहे.? | शबरी घरकुल योजनेंतर्गत रु १ लाख वाषिक उत्पन्नची मर्यादा आहे. |
| २२ | स्वयंसहाय्यता समूहाने घेतलेल्या कर्ज रक्कमेवर सवलत व्याज अनुदान कशा पध्दतीने देणेत येते | महाराष्ट राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्थापित कर्ज घेतलेल्या स्व.सहा.समूहांपैकी नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या स्व.सहा.समुहांना केंद्र शासनाकडून बँकामार्फत ७% व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.बँक व्याज दर व ७% व्याज दर यामधील तफावती एवढी रक्कम केंद्र शासन व्याज अनुदान म्हणून बँकेमार्फत सहा. समूहांच्या खात्यावर उपलब्ध करून देता येते. |
| २३ | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे उद्दिष्ट काय? | ग्रामीण भागातील गरीब व दारिद्रय रेषेखालील महिलांना एकत्र आणून त्यांचे स्व सहा.समूह स्थापन करून त्यांच्या सक्षम संस्था उभारणे. या संस्थामार्फत गरिबांना वितीय सेवा पुरविणे गरिबांची व त्यांच्या संस्थांची क्षमता वृद्धी व कौशल्यवृधी करणे आणि शाशवत उपजीविकेची साधणे उपलब्ध करून देऊन त्यांना दारिद्रयाच्या बाहेर येण्यासाठी मदत करणे.हे अभियानाचे प्रमुख उद्धिष्ट आहे. |
| २४ | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत संस्थीय बांधणी व | या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील व गरीब महिलांचे जे गट एसजीएसवाय मार्फत स्थापन केलेले अ सुरु असलेले स्व सहा. समूह नियमित ठेवणे व |

| | | |
|---|---|---|
| | क्षमता बांधणी कशा पद्धतीने करण्यात येते? | नविन स्व सहा. समूह स्थापन करणे, अनियमित स्व सहा. समूह नियमित करणे, बंद स्व सहा. समूह पुन्हा पुनुरुज्जीवीत करणे अशा प्रकारे संस्थीय बांधणी करण्यात येते. व स्व. सहा समूहांना द्शसुत्री पालनाचे प्रशिक्षण देवून समूहाचे हिशेब सुव्यवस्थित राहणेसाठी समुहातून हिशेबनीसाची निवड करून तिला हिशेबनिस चे प्रशिक्षण दिले जाते.जेणेकरून कर्जप्रस्ताव बँकेत सादर करताना समुहाचे रेकॉर्ड परिपूर्ण ठेवणे शक्य होईल.अशाप्रकारे त्यांची क्षमता बांधणी करणेत येते |
| २५ | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत खेळते भांडवल कशा पद्धतीने आदा करण्यात येते? | या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील व गरीब महिलांचे जे गट दशसुत्रीचा अवलंब करत असतील अशा स्व. सहा समूहांचे प्रथम श्रेणीकरण करून रु.१०,०००/- ते रु.१५,००० च्या मर्यादेत खेळते भांडवल रक्कम स्व .सहा समुहाच्या बँक खात्यात जमा करण्यात येते.ज्या स्व सहा.समूहांना पूर्वी फिरता निधी प्राप्त आहे अशा स्व सहा.समुहांना नव्याने फिरता निधी देण्यात येत नाही. |
| २६ | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत समूहांना बँकेमधून देण्यात येणार्या कर्जाचे स्वरूप कोणते? | स्वसहाय्यता समूहांचे दिव्तीय श्रेणीकरणानंतर पात्र स्वयंसहाय्यता समूहांना त्यांच्या एकूण बचतीच्या ५ ते १० पट किंवा रु.१०,००,०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल तेवढी कर्ज रक्कम देणे अपेक्षित आहे. तसेच स्वयंसहाय्यता समूहाने सदर कर्जाची परत फेड ही विहीत कालावधीमध्ये करणे आवश्यक आहे. या पध्दतीने गटाला रु.१०,००,०००/- लाखाच्या मर्यादेत कोणत्याही प्रकारचे बंधपत्र अथवा जामीन देण्याची आवश्यकता नाही.तसेच बचतीची रक्कम अथवा अनामत रक्कम बँकेत ठेवण्याची आवश्यकता नाही. |

## विभागाने केलेल्या उपक्रम व नाविन्यपूर्ण बाबी

महाआवास अभियान यशोगाथा व पुरस्कार वितरण फोटो

## मासिक/त्रैमासिक प्रगती अहवाल

## विभागाकडून वापरण्यात येणारे संकेतस्थळ

https://pmayg.nic.in

https://nrlm.gov.in